महाराष्ट्र शासन
## सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय
बी रोड, चर्चगेट, मुंबई - २०.
E-mail : sydprincipal@yahoo.co.in

फोन क्र.२२८८२११७,२२०४२८९७ फॅक्सक्र. २२८७१४५२


जा.क्र./सिडन/लेखा-२/२०२४-२५/1843 दि.०६/११/२०२४

# दरपत्रक/निविदा सादर करण्यासाठी सूचना

महाराष्ट्र शासनाचे सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय,चर्चगेट, मुंबई येथे सफाईगार/स्वछक यांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्याकरीता (करारनाम्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधी करिता) लिफाफा पध्दतीने दरपत्रके/निविदा मागविण्यात येत आहेत. यानुसार पात्र सेवा पुरवठादारांनी आपले दरपत्रक सिलबंद करुन महाविद्यालयाच्या आवक जावक विभागामध्ये **दि.१३ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत** हस्तपोच करण्यात यावे. संपूर्ण निवीदा प्रक्रिया ही **शासन निर्णय उद्योग,उर्जा आणि कामगार विभाग क्रमांक भाखसं २०२१/प्र.क्र.८/उद्योग-४, दि.०७ मे २०२१ नुसार दरपत्रकाच्या आधारे** होत असून दरपत्रक/निवीदा सूचना, अटी, शर्ती व शुध्दीपत्रक इत्यादी माहिती महाविद्यालयाच्या https://www.sydenham.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. दरपत्रकासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी सोबत देण्यात आलेली आहे.

**वेळापत्रक :**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| ०१. | दरपत्रक/निविदा प्रसिध्दी दिनांक | ०६.११.२०२४ | - |
| ०२. | दरपत्रक/निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३.११.२०२४ | दुपारी २.०० वाजेपर्यंत |
| ०३. | दरपत्रक/निविदा उघडण्याचा दिनांक | १४.११.२०२४ | सकाळी ११.०० वाजता |

दिनांक : ०६/११/२०२४
ठिकाण : मुंबई

**(डॉ.श्रीनिवास सा.धुरे)**
प्राचार्य
सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई

प्राचार्य
सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय
बी. मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

# दरपत्रक/निवीदा अर्ज

प्रति,
प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय,
चर्चगेट, मुंबई

**विषय :- स्वच्छता सेवा पुरविणे या कामाचा निवीदा अर्ज सादर करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आम्ही सर्व आवश्यक ती कागदपत्रे तपासून निवीदेसोबत सादर करीत आहोत. खाली सही करणार यांना निवीदेतील सर्व नियम व अटी आम्हाला बंधनकारक असून त्या आम्हाला मान्य आहेत. निवीदेतील सर्व अटी व शर्ती वाचून आम्ही वरील विषयांकित सेवा पुरविणे या कामाची निवीदा सादर केलेली आहे. जर खाली सही करणार यांची निवीदा मंजूर झाली तर निवीदेत स्पष्ट केलेप्रमाणे स्वरुप व व्याप्तीप्रमाणे तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सेवा देण्यात मी / आम्ही बांधील राहू व सदरबाबतीत आमची तक्रार असणार नाही.

जर खाली सही करणार यांची निवीदा मंजूर करण्यात आली तर आम्हास निवीदेतील नियमाप्रमाणे देय असलेली अनामत रक्कम रु.५०,०००/-(अक्षरी पन्नास हजार मात्र) सात दिवसात देणे आम्हास बंधनकारक आहे. व सदरबाबतीत आमची तक्रार असणार नाही.

आम्हास निवीदेच्या १ वर्षाच्या कालावधीमध्ये नमुद केलेल्या दरांप्रमाणे कामगार कायद्यांचा भंग न करता व कामाच्या स्वरुप व व्याप्तीनुसार सेवा पुरविणेस बंधनकारक राहील. सदरच्या कालावधीकरीता खालील सही करणार हे सर्व नियम व अटीनुसार सेवा पुरविणे बांधील राहतील.

जोपर्यंत अंतिम निवीदा तयार होवून ती परस्परांच्या सहमतीने कार्यान्वित होत नाही तोपर्यंत (निवीदा स्विकारणारे) सदरच्या प्रक्रीयेस बांधिल नसून तुम्ही अन्य कोणत्याही निवीदा स्विकारू अथवा नाकारू शकता.

**दिनांक :**
**ठिकाण :** **निवीदा धारकाची सही व शिक्का**

**प्रपत्र - अ**

**दरपत्रक लिफाफा**

सन २०२४-२५ या वित्तिय वर्षाकरीता आवश्यक असणाऱ्या ०४ सफाईगार/स्वच्छक यांच्या सेवा (स्वच्छता सेवा) पुरविणेकरिता सर्व कर/खर्च यांचा समावेश करून सादर केलेल्या दरांचा तक्ता.

निवीदाधारकाचे नाव :- ---------------------------------------------------------------------------

| **अ.क्र** | **कामाचे ठिकाण** | **वार्षिक ठेका रक्कम रुपये** | |
|---|---|---|---|
| १. | सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई | अंकी | अक्षरी |

१. सदर दरात खर्च कर / खर्चाचा समावेश केलेला आहे.

२. वरील संस्थेकरीता स्वच्छता ठेका पध्दतीने १२ महिन्याचा कालावधी किंवा करारनाम्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीकरीता आकारण्यात येत  असल्याचे ठेक्याची वार्षिक रक्कम ही दिलेल्या अटी व शर्ती मान्य करून व पूर्ण परिस्थितीचा विचार करून देण्यात आलेले आहे.

ठिकाण -

दिनांक -

निवीदा धारकाची सही

नांव व पत्ता

## प्रपत्र - ब

## (निविदेच्या अटी व शर्ती)

## (निवीदाधारकाने मान्य असल्याबाबत स्वाक्षरीत करुन दरपत्रकासोबत सदर प्रपत्र सादर करावे)

१. निवीदा धाराकाला अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे, अपुर्ण अर्ज/निवीदा विचारात घेतले जाणार नाहीत.

२. निवीदा सादर करताना सर्व खर्चाची सपुर्ण जबाबदारी ही निवीदाधारकाचीच असले याबाबत निवीदा धारकाची निवीदा नामंजूर केली असल्यारस सदरच्या निवीदाकरीता आलेल्या खर्चाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही याची नोंद घ्यावी.

३. अ.) प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई हे निवीदेमध्ये काही बदल करावयाची असल्यास सदरच्या निवीदेच्या अंतिम दिनांकाच्या वेळेपूर्वी शुध्दीपत्रकाद्वारे बदल करू शकतील. शुध्दीपत्रकाद्वारे निवीदा मधील बदल हे ग्राहय धरले जातील व सदर बदल हे निवीदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहतील. प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकामुळे निवीदा सादर करण्यास अतिरीक्त कालावधी वाढविण्याचा हक्क प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. याबाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल व ती माहिती निवीदा भरू ईच्छिणाऱ्यांना लागू होईल.

ब.) तात्रिक अडचणीमुळे निवीदा नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता निवीदा प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार तसेच त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई यांनी राखून ठेवलेले आहे.

४. निवीदा हया विहीत मुदतीत सादर करावायाच्या आहेत. अपूर्ण सादर केल्यास अथवा आवश्यक कागदपत्रांची पुर्तता नसल्यास निवीदा नामंजूर करण्यात येईल.

५. लिफाफा मध्ये सर्व कागदपत्रे सादर करण्यात यावीत. सदर कागदपत्रे पूर्ण असतील तरच निवीदा पात्र समजण्यात येईल.

६. निवीदेसोबत आलेली सर्व कागदपत्रे साक्षांकित असणे आवश्यक आहे.

७. कामगाराचे उत्तरदायित्व संबंधित निवीदाधारक संस्थेची/एजन्सीची राहील.

८. अपूर्ण आलेल्या निवीदा नाकारण्यात येईल तसेच उशिरा सादर केलेल्या निवीदेबाबतचे कोणतेही कारण ग्राहय धरले जाणार नाही. उदा. इलेक्ट्रीसीटी/ इंटरनेट इत्यादीबाबत निवीदा धारकास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

९. सुरक्षा अनामत :-

अ.) ज्या निवीदाधारकाची निवीदा मंजूर होईल त्या निवीदाधारकाचे रु. ५०,०००/- ( अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) सुरक्षा अनामत रक्कम कार्यालयाकडे ७ दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. अनामत रक्कमेचा धनाकर्श प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई यांच्या नावे काढण्यात यावा. तसेच रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार करून देणे बंधनकारक आहे.

ब.) कंत्राटदार मंजूर निवीदाधारक विहीत कालावधीत अर्धवट काम सोडून गेल्यास १ वर्षाच्या आत त्यास अदा न केलेल्या कामाचा कोणताही मोबदला दिला जाणार नाही. कंत्राटदाराचे नाव काळया यादीत टाकून अनामत रक्कम जप्त केली जाईल. त्याप्रमाणे जे काम वेळेवर व सुयोग्य प्रकारे केले जाणार नाही ती कामे उपलब्ध बाहेरील एजन्सीज/ माणसांकडून करून घेवून पूर्ण खर्च कंत्राटदाराच्या अनामत रक्कमेतून वसूल केला जाईल.

१०. अ.) स्वच्छता सेवेच्या कामाची पहाणी अचानकपणे प्राचार्य, स्वच्छता समिती यांचेकडून केव्हाही केली जाईल. त्याबाबतचे अभिप्राय नोंदविले जातील व असमाधानकारक सेवेबाबत समज देण्यात येईल. कामात सुधारणा दिसून न आल्यास प्रतिदिन रु. ५००/- इतका दंड आकारण्यात येईल. त्या महिन्याच्या वेतनातून सदरची रक्कम कमी करून वेतन अदा केले जाईल.

ब. ठेकेदार मंजूर निवीदाधारक विहित कालावधीत अर्धवट काम सोडून गेल्यास, १ वर्षाच्या त्यास अदा न केलेल्या कामाचा कोणताही मोबदला दिला जाणार नाही. ठेकेदाराचे नाव काळया यादीत टाकून अनामत रक्कम जप्त केली जाईल त्याप्रमाणे जे काम ठेकेदाराकडून वेळेवर व सुयोग्य प्रकारे केले जाणार नाही ती कामे उपलब्ध बाहेरील एजन्सीज/ माणसांकडून करून घेवून पूर्ण खर्च ठेकेदाराच्या अनामत रक्कमेतून वसूल केला जाईल.

कंत्राटदाराने त्याला दिलेल्या कामाचा ठेका त्याने व्यवस्थित रित्या पूर्ण केला नसल्यास संबंधित कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त केली जाईल.

११. निवीदाधारकाने सादर केलेल्या पत्रांची तपासणी आधी किंवा तपासणी झाल्यानंतर सदर बाबतीत स्पष्टीकरण व दारांचा तुलनात्मक तक्ता, समितीच्या शिफारशी कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस होणार नाहीत. अथवा याबाबत हक्क सांगता येणार नाही. याबाबातचे सर्व हक्क प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई यांचे राहतील.

१२. भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणाऱ्या तसेच उपरोक्त आरोप असलेले व सदरची माहिती या कार्यालयापासून लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास आपली निवीदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यात येईल.

१३. अ. कामावर असताना स्वच्छता सेवकांनी गणवेश परीधान करणे व ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील.

ब.) किमान वेतन कायदा १९४९ नुसार निवीदाधारकांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांस कामगार कायद्याप्रमाणे पगार देण्याची सर्व जाबाबदारी निवीदा धारकांवर राहील. कंत्राटदार संस्थेत कामगार वेतन नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

क.) पुरविण्यात आलेल्या सफाई कामगारांचे पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता व त्यांचे पासपोर्ट आकाराचा फोटोग्राफ तसेच चारित्राचे प्रमाणपत्र कंत्राटदाराने प्रमाणित करून त्यांचे ओळखपत्र संस्थेच्या कार्यालयात जमा करावे. तसेच बालकामगाराचा समावेश करण्यात येवू नये.

ड.)महाविद्यालयातील कामाचे ठिकाण :-

जिमखाना, नविन जिमखाना

तळमजला - सर्व वर्गखोल्या, प्रसाधनगृह, प्राध्यापक कक्ष, इमारतीच्या समोरील व पाठीमागील भाग, सभागृह कार्याक्रमा अगोदर,नंतर

पहीला माळा :- सर्व वर्गखोल्या, प्रसाधनगृह, स्टाफरुम, कार्यक्रमाआगोदर, नंतर, बी.एम.एस., बी.बी.आय. कार्यालय

दुसरा मजला :- प्राचार्य कक्ष,सर्व वर्गखोल्या, कार्यालय, ऑनलाईन कक्ष, कॉन्फरंन्स रुम, प्रसाधनगृह स्टाफ रुम, संपूर्ण ग्रंथालय

इ.) कामाचे स्वरुप :-

१.संस्थेतील सर्व वर्गखोल्या, भिंती , पायऱ्या दरवाजे खिडक्या जिना, प्रयोगशाळा यामधील जाळे काढणे, साबणाच्या पाण्याने स्वच्छ पुसणे, सर्व पंखे झाडू मारून साफसफाई करणे.

२. संपूर्ण प्रसाधनगृहामधील स्वच्छता, भिंतीवरील डाग, दारे खिडक्या, ॲसीड, फिनाईल हॉर्पीकने दररोज स्वच्छ करणे

३. संस्थेच्या इमारतीमध्ये दररोज पॅसेज पुसून घेणे, प्रसाधनगृह दोन वेळा स्वच्छ करणे.

१४. शासकीय अनुदान उपलब्धतेनुसार देयकाची रक्कम अदा करण्यात येईल. कदाचित शासकीय अनुदान वेळेवर उपलब्ध न झाल्यास आपणास विलंबाने देयकाची रक्कम अदा होईल अशा परिस्थीतीत कंत्राटदारास उशिरा देयकाची रक्कम प्राप्त झाली तरी त्यांनी नेमलेल्या कंत्राटी कर्मचांऱ्यांचे वेतन दरमहा १० तारखेच्या आत किमान वेतन कायद्यानुसार देण्याचे त्यांचेवर बंधनकारक राहील. निवीदाधारकाने दरमहा कमाल वेतन रजिस्टर हाजेरीपत्रक, व्हिजीट रजिस्टर, कार्यालय प्रमुखास व स्वच्छता समितीस दाखवणे त्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या सहया घेण्यात याव्यात व आपल्या सेवेबाबत वेळोवेळी कार्यालय प्रमुख यांच्याशी समक्ष भेटून चर्चा करावी.

महाविद्यालयातील वेगवेगळया विभागातील स्वच्छतेबाबत विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीसहित अहवाल सादर करावा लागेल. अन्यथा देयकाची रक्कम अदा करण्यात येणार नाही.

१५. कंत्राटदाराकडून पुरविण्यात येणाऱ्या सोई

१. झाडू, खराटे, ब्रश, मॉपर

२. डिटर्जंट डिसइन्फेक्टंट, फिनाईल, नॅफथॅलीन बॉल, ब्लिचींग पावडर, सॅनिटाईज,

३. कंत्राटी कर्मचाऱ्यांना गणवेश व ओळखपत्र

४. स्वच्छता कवच ( एप्रन, गमबुट, ग्लोव्हज)

५. स्वच्छतेसाठी लागणारे पाणी घेण्यासाठी लागणारे साहित्य साधनसामुग्री जसे प्लास्टीक बादली, मग, ब्रश आवश्यक ती फिटींग, फडका इ.

१६. सफाई कामगारांची वेळ ८ तास राहील. कामगार दोन वेळेत कामावर येतील. (२ महिला व २ पुरूष ) कर्मचारीसह एकुण ३ कर्मचारी दोन गटात वेगवेगळया वेळी पुढीलप्रमाणे उपस्थित राहतील.

अ) १ पुरुष व २ महिला, वेळ : सकाळी ०७ ते दुपारी ०३ ब) १ पुरुष सकाळी ०९ ते ०५

तसेच आवश्यकतेनुसार कामाच्या वेळेत बदल करण्याचे अधिकार प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई यांना राहील.

१७. **कामावर नियुक्त केलेल्या कामगारांच्या ESIC, EPF खात्यावर शासकीय नियमाप्रमाणे त्यांना देय असलेल्या रक्कमेचा नियमितपणे भरणा करण्यात यावा, तसेच भरणा केलेल्या पावतीची / चलनाची एक प्रत मासिक देयकासोबत महाविद्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच कामगारांच्या मासिक वेतनातून नियमितपणे Professional Tax (P.T.) वजाती केल्याची पावती महाविद्यालयास सादर करावी. या सर्व कपातींची नोंद मासिक देयकामध्ये असणे आवश्यक राहील.**

१८. **मासिक वेतन देयक सादर करताना ०२ सफाई कामगारांचे एक वेतन देयक व ०२ सफाई कामगाराचे स्वतंत्र देयक अशी एकूण दोन देयके प्रत्येक महिन्यात सादर करावीत.**

१९. उपरोक्त सफाई - स्वच्छतेचे काम काम पूर्ण:त कंत्राटी स्वरुपाचे असून कामावर नियुक्त होणारे कामगार कोणत्याही शासकीय लाभास पात्र असणार नाही.

२०. कामगारांच्या निष्काळजीपणामुळे संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान अथवा चोरी झाल्यास भरपाईची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

२१. सदर कंत्राटाची वैधता कंत्राट प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १ वर्ष कालावधी करीता राहील. त्यामध्ये बदल/मुदत वाढविण्याचे अधिकार प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई यांचे राहतील.

२२. **अर्ज करण्यास इच्छुक निविदाधारकाचे नोंदणीकृत कार्यालय हे ठाणे, नवी मुंबई व मुंबई या कार्यक्षेत्रातीलच असणे आवश्यक आहे. इतर ठिकाणी कार्यालय असलेल्या निविदाधारकांनी अर्ज करु नयेत, अर्ज केल्यास ते स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.**

२३. महाविद्यालयाच्या आवश्यकतेनुसार सफाईगार सेवेच्या नियमामध्ये फेरफार करणे, सुधारणा करणे, कामाची व्याप्ती वाढवणे तथा कमी करणे, कंत्राटाचा कालावधी वाढवणे किंवा काम समाधानकारक नसल्यास कंत्राट रद्द करणे याबाबतचे पूर्णत: अधिकार मा. प्राचार्य यांना राहतील. तसेच त्यांनी घेतलेले सर्व निर्णय आपणास बंधनकारक राहतील.

**उपरोक्त सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.**

**ठिकाण -**

**दिनांक -**

**निवीदा धारकाची सही**

**नांव व पत्ता**

**प्रपत्र - १**

# Proforma for past performance statement

(For a period of last 3 years, i.e. 2021-22,2022-23,2023-24)

**सेवा देत असलेल्या संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता :-**

| अ.क्र | सेवेचे नाव | अनुभव असलेल्या संस्थेचे नाव | दिनांक पासून | पर्यत | अनुभव असलेल्या संस्थेचे अभिप्राय | सेवा घेत असलेल्या संस्थेकडील शिक्का व प्रमुखाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**प्रपत्र -२**

**CONTACT DETAILS FORM**

**GENERAL DETAILS BIDDER**

1. NAME OF THE COMPANY
   --------------------------------------------------------------------
2. NAME AND DESIGNATION OF AUTHORISED REPRESANTATIVE
   --------------------------------------------------------------------
3. COMMUNICATION ADDRESS
   --------------------------------------------------------------------
4. PHONE NO./ MOBILE NO. ----------------------------------
5. FAX . -----------------------------------------------------------
6. E-MAIL ID -----------------------------------------------------

   **PARTICULAR DETAILS OF THE BIDDERS REPRESENTATIVE**

   1. NAME OF THE CONTACT PERSON
      ----------------------------------------------------------------
   2. DESIGNATION -------------------------------------------
   3. PHONE NO. ----------------------------------------------
   4. MOBILE NO.----------------------------------------------
   5. E-MAIL ID ---------------------------------------------

**UNDERTAKING**

1. I. the undersigned certify that I have through the terms and conditions mentioned in the bidding document and undertake to comply with them.
2. The rates quoted by me are valid and binding upon me for the entire period contract.
3. I/We give the rights to the competent authority of the office of the Principal, Sydenham College of Commerce & economics, Mumbai to forfeit the earnest Money/Security money deposit by mu/us in case of breach of condition of contract.
4. I hereby undertake to provide the services as per the directions given in the tender document/ contract agreement.

**Signature of the Authorized Signatory**

**Date :**

**Place :**

**Designation ;**

**(Office Seal of the Bidder)**

**प्रपत्र - ३**

**स्वयंघोषणापत्र**

मी ------------------------------------------------------------------------------ असे प्रतिपादन करतो की, या दरपत्रकासोबत सादर करण्यात आलेली माहिती माहिती, अटी, शर्ती तसेच वैयक्तीक माहिती मी पूर्णपणे वाचून समजून घेतली असून ती बरोबर असून ती मला मान्य आहेत. तसेच काही अपरिहार्य करणामुळे देयकाची रक्कम अदा करण्यास उशीर झाल्यास रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही याची मला/आम्हाला जाणीव आहे आणि पूर्ण कल्पना आहे व त्या मला/ आम्हाला मान्य आहे. तसेच निवीदेमध्ये दिलेली माहिती चौकशीअंती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्यावर/ आमच्यावर / शासनाच्या नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची मला/ आम्हाला जाणीव आहे. मी असेही प्रमाणित करतो की, माझ्यावर/ आमच्यावर शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रीया करण्यात आलेली नाही तसेच माझ्यावर/ आमच्यावर पोलीस विभागाकडून कोणताही गुन्हा नोंद करण्यात आलेला नाही.

**ठिकाण -**

**दिनांक -**

**निवीदा धारकाची सही**

**नांव व पत्ता**